Electronic International Interdisciplinary Research Journal (EIIRJ)

ISSN 2277-8721 UGC Approved Journal No 48833

# प्राचीन भारतीय शिक्षण पद्धती

**डॉ.विलास जाधव**

इतिहास विभाग प्रमुख

जे.ई.एस. महाविद्यालय, जालना

**प्रा. वाय.डब्ल्यू शेख**

इतिहास विभाग

जे.ई.एस. महाविद्यालय, जालना

प्राचीन काळापासून ते आजपर्यंत मानवाने जी प्रगती साधलेली आहे त्यामागे निश्चितच शिक्षण हा घटक महत्त्वाचा आहे. प्राचीन काळात शिक्षण हे मनुष्याच्या सर्वांगिण विकासाचे साधन मानले जात असे. प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीविषयी तत्कालीन विद्वानांनी लिहिलेला एखादा ग्रंथ अस्तित्त्वात नाही. ऋग्वेद, उपनिषद, संहिता, धर्मशास्त्र यामध्ये तत्कालीन शिक्षण पद्धतीची माहिती दिलेली आहे.

संस्कृत भाषेनुसार शिक्षणाचा अर्थ उपदेश करणे, शिस्त लावणे, वळन लावणे, मार्गदर्शन करणे असा होतो. शिक्षण या शब्दास दुसरा शब्द विद्या आहे. ऋग्वेदात म्हटले आहे की, मानवाला जो स्वावलंबी व नि:स्वार्थी बनविते तीच विद्या होय.

"सा विद्या या विमुक्तये" या ध्येयवाक्यात प्राचीन आर्यांनी शिक्षणविषयक आपला दृष्टीकोन व्यक्त केला आहे. विद्येला त्यांनी तृतीय नेत्र म्हटले आहे. विद्याध्ययन हाच मनुष्य आणि पशु यामधील फरक आहे असे त्यांना वाटत होते.

**शिक्षणाचे ध्येय : (उद्दिष्ट)**

ज्ञान ग्रहण करणे, सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे, कर्तव्यपरायणता आणि चारित्र्य संवर्धन ही शिक्षणाची उद्दिष्ट्ये होती.[१]

राष्ट्रीय संस्कृतीचा विकास व्हावा या दृष्टिकोनातून शिक्षणाची आखणी करण्यात येत असे.

**त्रिऋण कल्पना :**

विद्येचे ध्येय आणि कार्य याविषयी इतकी उच्च कल्पना असण्याचे कारण कदाचित प्राचीन आर्यांची त्रिऋण विषयक कल्पना असेल. प्रत्येक व्यक्तीला आपल्या आयुष्यात तीन ऋणांची फेड करावयाची असे. पहिले देवऋण-योग्यरितीने यज्ञ करून देवऋणाची फेड करता येते. दुसरे ऋषिऋण-विद्वान ऋषीची ज्ञानपरंपरा चालू रहावी म्हणून त्याची ज्ञानोपासना पुढे चालू ठेवणे

याने ऋषिऋणाची फेड होत असे. तिसरे पितृऋण शिक्षण संपल्यानंतर गृहस्थाश्रम स्वीकारून संततीस जन्म देऊन मानवी वंश चालू ठेवण्याने पितृऋणाची फेड होते असा विश्वास होता.[२] या ऋणांची फेड करणे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य मानले जात असे या करिताच आश्रम व्यवस्था केलेली होती.

**शिक्षण कोणाकरीता ?**

ब्रह्मचर्याश्रमचा प्रारंभ उपनयन विधीने होऊन शिक्षणाची सुरुवात होत असे. उपनयन शब्दाचा अर्थ-जवळ जाणे असा होतो. उपनयनविधी होऊन शिक्षणाची सुरुवात होत असे. उपनयन शब्दाचा अर्थ-जवळ जाणे असा होतो. उपनयनविधीने बालक गुरुजवळ शिक्षण घेण्यासाठी जात असे.[३] 'श्रावयेत चतुरो वर्णान' असे महाभारतात म्हटले आहे परंतु शूद्र वर्णीयांना पुढे शिक्षण घेण्याचे स्वातंत्र्य राहिले नाही फक्त त्रैवर्णिकांनाच शिक्षण घेता येत असे वर्णाप्रमाणे शिक्षणातही दिले जात असे.

**गुरुकुल पद्धती :**

प्राचीन काळात विद्यार्थी गुरुगृही जाऊन शिक्षण घेत असत हे शिक्षण नि:शुल्क होते. गुरुंचे व त्यांच्या कुटुंबियांचे सेवेचे कार्य शिष्य करत असे. गुरुंचा आदर केला जात असे. विद्यार्थ्यांना सदाचार, नि:स्वार्थ सेवा व नैतिकतेचे शिक्षण दिले जात असे.[४] राजपुत्रही गुरुगृही साधे जीवन जगत असे. शिक्षण संपल्यानंतर त्यांचा समावर्तन विधि होत असे.

**गुरु-शिष्य-संबंध :**

प्राचीन शिक्षण पद्धतीचे वैशिष्ट्ये म्हणजे गुरु आणि शिष्याचे जिव्हाळ्याचे संबंध हे आहे. शिष्य गुरुगृही कुटुंबातील सदस्या प्रमाणे राहात असे. गुरु पुत्राप्रमाणे त्याचे पालनपोषण करत असे. भगवान बुद्धांनी उपाध्यायांना नियम केला होता की, त्यांनी शिष्यांची देखरेख करावी. शिक्षणक्रमाची सुरुवात वयाच्या आठव्या वर्षी उपनयन विधिने होईल. गुरुगृही राहण्याचा काळ साधारणपणे बारा वर्षाचा असे. गुरुगृही राहून शिष्याने पित्याप्रमाणे गुरुची आज्ञा पाळावी व सेवा करावी तसेच घरची कामे करावी असा नियम होता. परंतु त्याच्या शिक्षणात कोणताही अडथळा येऊ नये याची काळजी गुरु घेत असे.[५] पूर्व वैदिक काळात जातिसंस्था परिदृढ नव्हती.वडिलांचे नावही माहित नसलेल्या सत्यकाम जाबालाचा हरिद्रूमत गोतम ह्याने विद्यार्थी म्हणून स्वीकार केला होता.[६]

**स्त्री शिक्षण :-**

स्त्रीयांनांही पूर्ववैदिक काळात शिक्षणाची संधी विपुल प्रमाणात मिळत असे. धार्मिक व आर्थिक चर्चेत त्या भाग घेत असत. समाजातही त्यांना बहुमान प्राप्त झाला होता.[७] प्राचीन ग्रंथांमध्ये विद्वान स्त्रीयांचे उल्लेख आलेले आहेत. त्यामध्ये गार्गी, मैत्रयी, लोपमुद्रा यांची नावे प्रसिद्ध आहेत. परंतु उत्तर वैदिक काळामध्ये स्त्रियांच्या शिक्षणावर मर्यादा आल्या होत्या.

**अभ्यासविषय :**

प्राचीन शिक्षण पद्धतीत अभ्यासक्रमात काळानुसार परिवर्तन होत गेले. प्रारंभी वैदिककाळात (२९०० इ. पू.) पर्यंत मुख्यविषय देवमन्त्र, इतिहास, पुराण आणि चरित्रग्रंथ होते. ब्राह्मणकाळात (ई.स.पू. २००० ते १०००) मध्ये वेदांबरोबरच ब्राह्मण ग्रंथ

समाविष्ट करण्यात आले. उपनिषद इ.स. १००० ते पहिल्या शतकापर्यंत वेदांचे विविध अंग ब्रह्मविद्या, इतिहास, पुराण, नीतीशास्त्र, गणित, खगोलशास्त्र, व्याकरण, भाषाशास्त्र, लष्करी विद्येचे शास्त्र, शकुन इ. विषयांचाही शिक्षणामध्ये समावेश होत असे. अथर्ववेदातही अनेक विषयांचा उल्लेख आहे.[९] गुरुने तोंडी सांगावयाचे व शिष्याने आपल्या स्मृतीमध्ये साठवून ठेवावयाचे ह्या पद्धतीने शिक्षण पूर्ण होत असे बौद्धकाळात अनेक मठ व विहारांची निर्मिती झाली व ते शिक्षण प्रसाराचे केंद्र बनले. ह्याशिवाय पैठण, कांची, अनुराधापूर, पाटलीपूत्र, उज्जैयिनी येथेही लहानमोठी विद्यापीठ होती.[१०] गुप्तकाळ स्थापन झालेल्या नालंदा विद्यापीठाची ख्याती सर्वदूर पसरली होती. त्याकाळातील ते वस्तीगृह असलेले पहिले शिक्षणकेंद्र होते. विविध देशातून विद्यार्थी या शिक्षणकेंद्रात शिक्षण घेण्यासाठी येत असत. येथे प्रवेश परिक्षा घेण्यात येत असे.[११]

अशा प्रकारे प्राचीनकाळात शिक्षणास महत्त्व प्राप्त झाले होते व शिक्षण देणारी अनेक विद्यापीठ उदयास आलेली होती.

**निष्कर्ष :**

शिक्षण क्षेत्रात भारताने वैदिक काळात प्रगती साधली. विज्ञान, गणित, ज्योतिष, चिकित्साशास्त्र, रसायनशास्त्र या विषयांचे सखोल अध्ययन करून त्यांचे भाण्डार उपलब्ध करून दिले. तत्कालीन राजांच्या दानशूर वृत्तीमुळे नालंदा विक्रमशीला, वल्लभी, उदन्तपुरी या विद्यापीठांचा विकास झाला आणि उत्कृष्ट व दर्जेदार शिक्षण घेण्याची संधी प्राप्त झाली. यामुळेच प्राचीन काळात जितकी साक्षरता भारतात होती तितकी त्याकाळात कोणत्याच देशात नव्हती.

प्राचीन शिक्षण पद्धतीच्या माध्यमातून भारताने अनेक वर्षे पाठांतराच्या मौखिक परपंरेद्वारे विशाल वैदिक वाङ्मय सुरक्षित ठेवले. विविध शास्त्रात निपुण विद्वान निर्माण झाले. ज्यांच्यामुळे भारताची मान उंचावली. प्राचीन काळात शिक्षण धर्माचा भाग मानला जात होता. त्यामुळे शिक्षण घेण्याकडे सर्वांच कल असे परंतू आधुनिक काळात शिक्षण राज्याद्वारे अनिवार्य केले जात आहे. प्राचीन काळात गुरु सर्व विद्यार्थ्यांकडे लक्ष देऊन त्यांच्या समस्या सोडवण्याकरीता तत्पर राहात असे. गुरु-शिष्य यांच्यातील सवांदाने विषयाचे आकलन होत असे. आधुनिक काळात विद्यार्थी निष्क्रियपणे गुरुंचे व्याख्यान ऐकतात ज्यामुळे त्यांचा मानसिक विकास व विषयाचे आकलन होत नाही.

आधुनिक शिक्षण प्रणालीची विद्वता ग्रंथालयात ठेवलेल्या विश्वकोषात आहे. परंतु प्राचीन पंडित आपल्या शिष्यांना चालता फिरता विश्वकोष बनवायचा प्रयत्न करत असत.

चारित्र्य निर्माण करणाऱ्या या प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीची प्रशंसा मॅगेस्थीनीस, मार्कोपोलो, ह्यूएनत्संग या परकीय प्रवाशांनी केलेली आहे. गुरुकुल पद्धती, गुरु-शिष्य परंपरा, निःशुल्क शिक्षण, मानसिक विकास, चारित्र्य निर्माण, सांस्कृतिक एकतेची निर्मिती, विविध शास्त्रातील प्रगती ही प्राचीन शिक्षण पद्धतीची फार मोठी देणगी मानली पाहिजे. प्राचीन नालंदा विद्यापीठ जगप्रसिद्ध होते, पण आज जगातील उत्कृष्ट १०० विद्यापीठात भारतातील एकही विद्यापीठाचे नाव नाही ही बाब विचार करण्यासारखी आहे. काही दोष वगळल्यास आधुनिक युगात प्राचीन भारतीय शिक्षण पद्धती अनुकरणीय व अभिमानास्पद आहे.

**संदर्भ :**

Sangh Mittra Bakshi, Ancient Indian History, Common Wealth Publication New Delhi, Ist Edition 2003. P-97.

वेदालंकार हरिदत्त, भारतीय संस्कृति का संक्षिप्त इतिहास, आत्माराम एंड सन्स, दिल्ली, दुसरा संस्करण १९५८. P-१५.

कित्ता - पृ.१६५.

डॉ.सिंह विन्देश्वरी प्रसाद, विश्वसभ्यता का संक्षिप्त इतिहास, श्री शांतीलाल जैन मॅनेजिंग प्रोपाइटर पटना, १९५२. पृ.३१७.

वेदालंकार हरिदत्त, उपरोक्त, पृ.१६८.

कोसंबी डी.डी., भारतीय इतिहासाचा अभ्यास, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे. पृ.२१२.

पाटील लीला, आजचे शिक्षण आजच्या समस्या, विद्या प्रकाशन, पूणे. पृ.२१२.

वेदालंकार हरिदत्त, उपरोक्त, पृ. १७०.

आचार्य केशट्टीवार, प्राचीन भारताचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ.२३४.

ठाकूर आद्यादत्त, वेदो में भारतीय संस्कृति, ज्ञानमंडल लि. वाराणसी, प्रथम संस्करण १९६७, पृ.२९३.

Sangh Mittra Bakshi, Op-Cit- P-38.